विषय काव्य
सं. क्र. ९३००

# स्यामली

रजनी कृष्णन्कुट्टी



REFBK-0022602
REFBK-0022602

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र.मा.प.)

काव्य
२२६०२
संदर्भ
२३९९

रजनी कृष्णनकुट्टी

REFBK-0022602

# श्यामली

२२६०२
काव्य
२३९९

सरिता प्रकाशन

प्रकाशक :
सौ. मंदाकिनी भावे
सरिता प्रकाशन
'वरदा' सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६

किमत : नऊ रुपये

पहिली आवृत्ती : अनंतचतुर्दशी १९७८

© रजनी कृष्णन्‌कुट्टी
मुंबई २०.

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

मुद्रक
सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय
१२९८, शुक्रवार पेठ
पुणे ४११ ००२

कविवर्य बा. भ. बोरकर यांस;
सविनय अर्पण.

# अनुक्रम


| | पृष्ठ |
|---|---|
| काळ गेला | १ |
| इंद्रधनुष्य | २ |
| सांगावा | ३ |
| सुहृदांनो | ४ |
| वादक | ५ |
| प्रतिमा | ६ |
| वाट | ७ |
| हितगुज | ९ |
| दयाघना | १० |
| स्मरण | ११ |
| शुभमंगल पाउले | १२ |
| छंद | १३ |
| ज्ञानेश्वर | १४ |
| गुन्हा | १५ |
| काळ | १६ |
| आकर्षण | १७ |
| स्पर्श | १८ |
| मनरमणा ! | १९ |
| कृष्णचंद्र | २० |
| श्रावण-गीत | २१ |
| स्मृती | २२ |
| भूलभुलैया | २३ |
| भ्रमरांचे मागणे | २४ |
| जातिका | २५ |
| मोकाट वर्षे | २६ |
| प्रेमलहरी | २७ |
| दर्शन | ३० |
| लाटांची साखळी | ३१ |
| आलिंगन | ३२ |
| पिंगा | ३३ |
| वेडा | ३४ |
| कहाणी– अशीच एका आत्म्याची | ३५ |
| प्रेमाची ग्रहरास | ४० |
| भरवसा | ४१ |
| भले सांगती | ४२ |
| स्त्री | ४३ |
| समय विहग | ४४ |
| क्षण | ४५ |
| पैलतीर | ४६ |
| स्पर्श | ४७ |
| झूला | ४९ |
| मरणवधू | ५० |
| अबोली | ५१ |
| प्रीत | ५२ |
| स्त्रीची कैफियत | ५३ |
| गोवा | ५४ |
| कारुण्यमूर्ती | ५५ |
| प्रतीक्षा | ५६ |
| झुळूक | ५७ |
| कृतार्थ | ५८ |
| पूर्ण चंद्र ही प्रीत | ५९ |
| पसर आभाळ | ६० |
| पूजा | ६१ |
| जा तू | ६२ |
| स्पर्श | ६३ |
| विलापिका | ६४ |
| पीपासा | ६६ |
| ऋतुचक्र | ६७ |
| वास्तवता | ६८ |
| नियतीचे जाते | ६९ |
| शापित | ७० |
| याच क्षणाचे | ७१ |
| यात्रा | ७२ |

दा. क्र. २२६०२

## काळ गेला

काळ गेला यौवनाला पोतडीमधि घालुनी
आणि आला मजसमोरी आज छद्मी हासुनी

धीट मी सांगेन त्याला नजर माझी रोखुनी
आजही नांदे सुखाने प्रेम माझ्या जीवनी

आयु गेले सोहळा गेला ऋतूंचा संपुनी
राहिले परि प्रेम-कौस्तुभ हृदयकोषी साठुनी

कालमर्यादांस गेले प्रेम हे उल्लंघुनी
सर्वसाक्षी प्रेमपक्षी जाय भव ओलांडुनी

# इंद्रधनुष्य

कृष्ण कुरलशा केशकलापी
नील नितळशा घनराशी
चतुर लोचनी चंचल चरणी
चमके चपला अविनाशी

शीतल श्वसनी शिशिरशूलसा
विव्हल करि वादळवारा
अस्फुट अधरी अविरत ओतसि
अनुपमशी अमृतधारा

सुहास्य वदनी सूर्य किरण मग
करि आव्हानित अभिलाषा
आल्हादित अंतरी प्रकटवी
सप्तरंगि इंद्रधनुष्या

# सांगावा

सूर्य झुकला बुडला, कुंद, सुंद हवा आहे
ओल्या अंधाराच्या खंती सोबती काजवा आहे

अर्धी गेली संध्याकाळ रात्रीचा सांगावा आहे
रोमरोमी लाख कान कानी गोड पावा आहे

निघे जीवनी दिवाळे यशाची वानवा आहे
जीवा हळव्या तोलाया चांदाचा ताजवा आहे

कुठे विश्वास प्रेमाचा, दुरावा आडवा आहे
असो विश्वास फसवा, स्वप्नात मेळावा आहे

हाती नरोटी फुटकी, जन्माचा जोगवा आहे
असो सत्याचा रुसवा, आभासांचा ठेवा आहे

चक्रव्यूहांच्या या देशी भरला भुलावा आहे
शंका संशय कसचा फिकीर माधवा आहे

कानी गोड पावा आहे सुखाचा सांगावा आहे
धरू कोणाशी रुसवा जावयाचे गांवा आहे

# सुहृदांनो

सुहृदांनो–

कां बजावता आव आणुनी मज दिनरात
'सोड स्वप्नरति उणे न पडु दे कर्तव्यात'?
साठवली का कर्तबगारी कर्तव्यांत ?
बुद्धिकुशलता सोंगट्यांचिया खटापटात ?

सुहृदांनो–

त्यात का असे जीवनपूर्ती, सुखसंभार ?
ते तर केवळ देहधर्म अन् नित व्यवहार
बुडुनि त्यांमधी सांडवू कशी निज संस्कार .
लौकिकार्थ का विकु भावांचे विश्व अपार ?

सुहृदांनो–

स्वप्नकूजनी सहज आत्म मम दे हुंकार
प्रेमपूजनी पावत सुंदर साक्षात्कार
कां न झिंगु मी स्वप्नप्रीतिच्या आवर्तात ?
गुंगुनि कां मी नको जाउ या चिरप्रणयांत ?

सुहृदांनो–

हेच कर्म, मम कर्मयोग या स्वप्नपथात
हेच विश्व, मम जीवनपूर्ती चिरप्रेमात

## वादक

तू वादक, वीणा तव मी संगीत आपुला प्राण
तू वादक, वीणा तव मी तुजविण जीवन वीराण

काजळ काळे कुंद कोपरे
सुन्न उभी मी मूक थरथरे
अकस्मात छेडताच तू रे

अमृतमय जीवनस्पर्शाने जागृत झाले प्राण
तू वादक वीणा तव मी तुजविण जीवन वीराण

आस अता ही एकच मजला
झंकृत कर मम हृद्‌वीणेला
श्रवणतृषा अनिवार जगाला

मधुर सुधेसम जादूगारी अमर रंगु दे तान
तू वादक वीणा तव मी संगीत आपुला प्राण

# प्रतिमा

रुपवती निर्मल प्रतिमेला
मंदिरात स्थापियले
अंधभक्तिने भावोल्लासी
भजन भाबडे केले

चंदन चर्चित मूर्ति अक्षयी
सुमसंभारी दडली
मग्न पूजनी भाविक निशिदिनि
नयनदळे तव मिटली

कसे पूजका ! सांगू तुजला
देवी तेथे कुठली
स्खलित मूर्तिला पवित्र देवी
कधीच त्यागुनि गेली

भावभक्तिने पूजिलीस ती
मीच अभागी प्रतिमा
सह-दुःखाचे अश्रु ढाळिते
जाणुनि अपुल्या सीमा

# वाट

आठवणींची पाउले, एकामागे एक
एका वेडसर दिशेने
कुठे जाते ती वाट ?
पडतच जातात पाउले एकामागे एक
लताकुंज सजलेला पानांनी हिरवागार
वर कृष्णकमळांची आरास
जुईचा धुंद प्रमाथी गंध
ठायी ठायी गुंगलेले भ्रमर-वृंद
आणि त्या आकृती, ते सत्य की भास ?

पण धरली नव्हती आपण ती वाट
जे असते घडू शकले
आणि जे घडले
जन्मदाते आहेत ते खुज्या वर्तमानाचे
उठत आहेत मंद मंद प्रतिध्वनी
‘तू माझा आहेस, माझाच
या...या थरथरत्या श्वासांप्रमाणे’
‘तू माझी आहेस, माझीच
क्षणोक्षणी निकट येणाऱ्या मृत्यूप्रमाणे’

पण धरलीच नव्हती आपण ती वाट
गत स्वप्नांना कसला अर्थ ?
कुजली असतील कृष्णकमळे

कोळपला असेल जुई-गंध
आणि ते भ्रमर-वृंद
पडले असतील धुळीत निष्प्राण
जे असते घडू शकले
आणि जे घडले
साक्षी आहेत ते निर्दोष वर्तमानाचे

# हितगुज

तुझ्या स्कंधावरी प्रेमे दिनांती मी विसावावे
तुझ्या कस्तूरिच्या श्वासे सख्या अंगांग भारावे

तुझ्या शीतोष्ण हातांनी कधी हे नेत्र झाकावे
तमी तेजाळ प्रेमाचे प्रभावी रूप देखावे

तुझ्या अंगूलिने देही रसीले चित्र रेखावे
तुझ्या रेशीमस्पर्शी रोमरोमी गोफ गुंफावे

प्रमाथी चुंबनांनी कोमलांगी रक्त पेटावे
भिजोनी कामरंगी द्राक्षवल्लीने पिसाटावे

इथे मी कामक्रीडेच्या भरी निःशब्द लाजावे
तिथे त्या गात्रगात्रांचे तरी हितगूज चालावे

# दयाघना

सर्व लुटुनि दृष्टि दिली तुजसि देखण्या
हे दयाघना ।
देह जातसे झडुनी
अंगांगे जाति सडुनि
विद्रुप हे रूप न कुणि ठरत पाहण्या
हे दयाघना ।
चुंबिण्यास कुसुमअधर
भावाकुल स्पर्शातुर
दूर आज साजण नच धजत स्पर्शिण्या
हे दयाघना ।
जाळित तन हे वेदन
झुकले मम छिन्न वदन
वर पडती अनुकंपित अमित डागण्या
हे दयाघना ।
लुटिले तू सर्वस्वा
हाचि ठरे वर बरवा
अंतर हे आळवीत भक्ति-रागिण्या
हे दयाघना ।
भावबंध हे तुटले
स्वार्थ मोह हे सुटले
आसुसले त्वत्पदि मी आत्म वाहण्या
हे दयाघना ।

# स्मरण

गेल्यावर मी दूर दूर तू स्मरशिल माझे काय काय रे

आठव माझे भोळे यौवन मंद मधुरशी अपार कवळिक
अधरि विलसले निष्पापत्व नि नजर मनस्वी जी प्रामाणिक
नकोस विसरू कोते माझे खुळे मन नि खोटा अभिमान
रूतला हृदयी बाण रेशमी तरिहि चेहरा सस्मित म्लान

क्षणैक आठव मम दुष्टावा केले कपट नि दिधले क्लेश
नीतिधर्म खंडुनिया तुजस्तव आले तुजपाशी सावेश
राहियले तुजपाशी बनुनी तुझी दिवाणी प्रेमसखी
तुलाच मिरवित सदा चालली माझी ही अधु हृदय-पालखी

उरले ना जरि आता यौवन नाही उरली आज कोवळिक
अन्य सर्व लाथाडुनि जीवनि एक इच्छिली तुझीच जवळिक

## शुभमंगल पाउले

नीलांचल तरल वात
मुग्ध नवल या प्रशांत
स्निग्ध धवल चांदण्यात
भावाकुल नयनांनी स्पष्ट पाहिली अताच शुभमंगल पाउले
निशिदिनि जरि बसते वनि
आळवीत मोहन मनि
अवचित या अदभुत क्षणि
सहजचि मीताललयी मंदमधुर पदि नूपुर रुणझुणता ऐकले
गंधमालती उपवनि
धुंद कोंदला तनमनि
जादुगारि मुरली-ध्वनि
अंतरंग मम रंगुनि या विनम्र हृदयांतरि भक्तिभाव परिमळले
केशर कस्तूरि भालि
अधरी धरि मधुर मुरलि
प्रेममूर्ति ती सावळि
नयनांजन यदुनंदन मनमोहन अनुपम ते रूप गडे देखिले
नीलांचल तरल वात
मुग्ध नवल या प्रशांत
स्निग्ध धवल चांदण्यात
चरणि घालताच मिठी, हाय ! कशी अंतरली शुभमंगल पाउले

## छंद

केसात धूप सौगंध
दृष्टीत केवडा धुंद
श्वासांत कर्पुरी गंध
ओठांत कस्तुरी बंद

स्पर्शात रेशमी बंध
जीवास मोहवी छंद
छंदास कसा धरबंध
हा छंद प्रेमनिष्यंद

छंदात प्रेम हो अंध
तरि अंध न हा संबंध
प्रेमात नको निर्बंध
आनंद असो स्वच्छंद

## ज्ञानेश्वर

ज्ञानदेव ज्ञानेश्वर । ज्ञानामृताचा सागर
अवतरला परमेश्वर । मानवरूपी

नमूनिया वाग्विलासिनी । घडवी साहित्याची लेणी
अमृताते पैजा जिंकुनी । जिंकी मने

वाणीमाजी सरस्वती । अशी ओवी ओघवती
शब्दगंगे ये भरती । दर्शनमात्रे

हरि आनंदाचा कंद । 'राम कृष्ण गोविंद'
धरो सांगे दृढ छंद । या मंत्राचा

हा ज्ञानी तेज-सविता । राही अल्प कालापुरता
परि केला मार्ग उजळता । सकळांसाठी

दुःख-नैराश्यी दीनवाणे । दुर्दैवी जीवाने पिचणे
हे नित्याचे रडगाणे । चुकले नाही

परी ज्ञानाचा हा योगी । शिरोनिया अंतरंगी
जाण्या प्रमेयांच्या जागी । मार्ग दावी

भवतापे जलांश शोषिता । ओलांश पुरवी हा मागुता
पूर्ण चंद्राची शीतलता । याचे ठायी

रूप अरूपासी दिले । अतींद्रिय इंद्रिये भोगवीले
प्राणांसि भारिले परिमळे । मोगऱ्याचिया

अजुनी जागी जाणीव । अजुनी ओला आठव
मोगऱ्याची हो राणीव । मनोमनी

# गुन्हा

रहावेच लागले उभे आरोपी म्हणून
न्यायालयात तुझ्या
तर नाही विचारणार काय माझा गुन्हा
पण जुन्या आयुष्याची
लक्तरे निष्प्राण नको रे फेकूस
अंगावर पुन्हा पुन्हा

त्यागिली होती मी ती जीर्ण देह मानून
ल्यायली वस्त्रे नवीन
जाडाभरडा वाण पण आधीन त्यांच्या प्राण
झाल्या असल्या जरी
चिंध्या चिंध्या याही तरी झाकले त्यांनी
महारोगी माझे प्राण

त्यागणार ना त्यांना
होवो झाली दैना
कबूल, कबूल माझा गुन्हा

# काळ

चुकले भुलले कधि वाहवले अडखळले मी तरिही
काटेरी हाताच्या काळा कधी विसरले नाही

देहां-प्रेमां-शौर्यांचे नित काढियले वाभाडे
वीरबाहु बलवान नायकां केले पंगू वेडे
कुसुम-कोमला रूपवतींची विद्रुप केली ध्याने
वज्रशक्ति निष्ठांची चेष्टा विटंबना काळाने
'जीवन सारे क्षणभंगुर' जो नित्य फिरवितो द्वाही
काटेरी हाताच्या काळा कधी विसरले नाही

ताठ मान अन् दृष्टि सरळ मी काल ठेवुनी होते
काळापुढती आज जरासे धैर्य गमे ते कोते
आशांचे स्वप्नांचे होते फुटले उरी धुमारे
उदासवाण्या भविष्यास अजि जातांना सामोरे
झुकले तनमन तरी पाहते दृष्टि समोरी काही
काटेरी हाताच्या काळा मुळी विसरले नाही

समीप येता अंत पाहते दृष्टी अंतापुढती
अंतापासुनि अनंत आदी दिसती चालू होती
दीपक मालविले तरि साऱ्या अंधारांच्या पुढती
दृष्टि तेवता सहज गवसल्या अनंत तेजोज्योती
काटेरी हाताच्या काळा जरी विसरले नाही
अंतर्बाह्य उजळली विश्वे मांगल्याच्या डोही

# आकर्षण

ती– विस्तीर्ण आकाश आकाश
जाळे पसरलेले प्रकृतीने
जडवून माणके अवयवांची
विणले आहेत कौशल्याने
आवळणारे अत्तरी धागे

मदिराक्ष चंद्र, मलमली चांदणे
स्पर्शलाघवी मखमली वायू
सोमरसात मुरलेला अंधार
अंमली नशेत धुंदावलेले रोमरोम
सारेच तिचे साथी धार्जिणे

ती–प्रकृतीचे जाळे
तो–एकटा अगतिक
झेपावत अदम्य ओढीने
सृष्टीच्या सनातन कारस्थानाचा
अजाण बळी

## स्पर्श

मुग्ध मनी प्रीतिच्या मिषाने
येसी तू निष्पाप पाहुणा
दग्ध मला भिजल्या ओठांनी
घातलास रे स्पर्श-उखाणा

स्पर्शरसायन हताश हृदया
मधुरालिंगन विकलित प्राणा
स्पर्शोल्लासी भग्न तनमना
दिले राजसा सुखनिमंत्रणा

स्पर्शी जुळुनी अतूट नाते
पटल्या रक्ताच्या जन्मखुणा
स्पर्शरचित उत्तुंग मनोरे
स्पर्शशिल्प ते भिडले गगना

स्पर्शास्पर्शांची ही शिंपण
प्रेम कशाला वृथा बहाणा ?
स्पर्शास्पर्शांची जरि गुंफण
अपार्थिवाची अनघ अर्चना

## मनरमणा !

मरणा ! मम मनरमणा !
आत्मचंद्र ग्रासला राहुने, सोडव जीवनग्रहणा
मरणा ! मम मनरमणा !

घे धागा हा जये न काही विणले, नुसता गुंता
तोड त्यास अन् दे या जीवा तुझी दयामय करुणा
मरणा ! मम मनरमणा !

पाखडला हा जीव, जाहले धिडवडेच तयाचे
कुशीत घे रे त्यास, पिचूनी अस्थिच उरल्या सरणा
मरणा ! मम मनरमणा !

व्यर्थ भाळुनी जीवनावरी केली किति मनधरणी
जीव पोळुनी शिकले करण्या अखेर तुझिया स्मरणा
मरणा ! मम मनरमणा !

तुझाच आता आधार जिवा पाहु नको रे अंता
प्रीती केली जीवनावरी म्हणुनि करिसि का घृणा
मरणा ! मम मनरमणा !

# कृष्णचंद्र

कणखर काळ्या कुशीत कलली
भरदिवसा अवसेची रात
तशात मिटता लोचन उठले
अणुरेणू स्वच्छंदे गात

पेरियली श्वासाश्वासांनी
बीजे रोमी रतिमोहाची
आमंत्रित मग अधर-भ्रमरां
फुलली बागच मोहफुलांची

अधरे आलिंगनी स्पर्शिली
काळी मखमाली कमळदळे
मीलनक्षणि कस्तुरी उधळुनी
परिमळली प्रच्छन्न वादळे

कणखर काळ्या कुशीत कलता
भर दिवसा अवसेची रात
परिमळल्या अंधारी उगवे
कृष्णचंद्र अविकल्प उरात

# श्रावण-गीत

गगनि डवरला मेघ मधूचा मधुरस त्यातुनि ओसंडे
तृप्त वृक्षवेलींवर हिरवे गर्द जर्दसे नवल चढे

पानांच्या हिरव्या भिंगातुनि पोपटि तांबुस ऊन्ह गळे
नवजात शिशू खगमिथुनांचे घरटयांमधुनी किलबिलले

चिवचिव टिवटिव नव नादांचे तोरण जैसे बांधियले
फूलपाखरांसवे नवेसे गीत रंगले रसरसले !

आवाजाला पंख फुटोनीं स्वर-कारंजे थुयथुयले
गीत-पिसारा उभारुनी मन मयूररंगी थयथयले

तृणातृणाचे ऋण फिटले अन् चिंब वायु हा गहिवरला
जलधारांच्या धाग्यांमधुनी गीत-तन्मणी गुंफियला

वीज श्रावणी चैतन्याची हृदयाला विंधुनि गेली
खिन्न मनाचा बास बासरी बनुनि आळवी स्वरावली

# स्मृती

जल लहरींवर चंद्र हासरा चमकवि अचपळ जळी रुपे
चंचल चित्ता करिते स्तंभित स्मृती सारूनी दूर तपे
असाच गहिरा आकाशातिल चंद्र जळी तेव्हां उतरे
आणिक हसरा गात्रांमधला चंद्र हृदयि शोभा वितरे

परस्परांच्या गळ्यात घालुनि करद्वयांच्या सुममाला
होतो बसलो नदी किनारी गुंफित कंठी स्वरमाला
अधरी प्राशित अधरसुधामृत नेत्रीं अमृत चंद्राचे
गीत गाइले होते आपण प्रेमदिवाण्या पक्ष्याचे

'जडवुनि वेडी प्रीत बावरा चंद्रावर खिळवी नजरा
होई हर्षित जळात बिंबित चंद्रा पाहत मूढ खरा
साक्ष प्रीतिच्या परतफेडिची पागल पाही जळामधी
रास रचोनी तारकांसवे चंद्र हासतो नभामधी '

होतो दोघे चकोर आणिक फसवा गमला चंद्र तदा
प्रेमपूर्तिची नव्हती आशा दुर्दैवच दे साथ सदा

प्रसन्न वदनी परी समोरी आली प्रेमळ प्रीत-परी
सहस्त्र मरणे साहुनि आम्ही परतविले दुर्दैव घरी

चंद्राची मग प्रशांत हसली प्रतिबिंबे प्रमुदित हृदयी
बिंबित चंद्रा चुंबचुंबुनी लाजविले पुलकित प्रणयी

जललहरींवर चंद्र हासरा चमकवि अचपळ जळी रुपे
बघता हृदयी चंद्र हासरा पुनरपि भान गडे हरपे

## भूलभुलैय्या

सारा का तो भूलभुलैय्या
सांग साग रे कृष्णकन्हैया
रास खेळलो ओलांडुनिया
सीमा आम्ही संसाराच्या; सरली माया सरली किमया ?
सांग सांग रे कृष्णकन्हैया।

प्रथम दावुनी अक्षय प्रणया
भुलविलेस तूं भोळया हृदयां
त्यागुनि जासी असा निर्दया
खरेच का रे गेले सखया, विमल प्रेम ते सारे वाया ?
की तो केवळ भूलभुलैय्या ?

आम्हां जासी तू सोडुनिया
सहस्त्र भार्या तुज रमवाया
इथे सांडले जीवन वाया
देही अमुच्या अजुनी जळती, काजळती प्रेमाच्या समया
सांग, काय रे करू कन्हैया।

जन्मांची खुणगाठ पटुनिया
कृष्णमयच ही झाली काया
उरे न अन्य गती रे अदया।
असो तुझ्यास्तव भूलभुलैय्या मात करिल मृत्यूवर माया
'कृष्ण' 'कृष्ण' जयघोष करुनिया

# भ्रमरांचे मागणे

नादां-शब्दांनी अडकविले धरिले आम्हांला वेठी।
वाऱ्यावरती लाज सोडली बिनदिक्कत यांच्यासाठी
शब्दच ते पण कधीहि जातिल घात करोनी कोणाचा
कसा धरावा विश्वास कुणी अनगड भोळ्या शब्दांचा
शब्द-कल्पनांची ही सृष्टी वेड्या हृदयी रंगविली
काळ्या पंखांवरी अधीष्ठित अवकाशी ती स्थिर गमली
कल्पनाच ती; दंवबिंदूला सूर्य मिटवि हा व्यवहारी
तरी मागणे या भ्रमरांचे देवा एक तुझ्या दारी
हृदयस्पर्शी प्रतिध्वनी तव निश्वासाच्या गीतांचा
पंखांच्या गुंजारवि उमटो वेड्या आम्हा भ्रमरांच्या

२२६०५
का१०५
२३ee

## जातिका

इतर जनांच्या कंठी शोभे गंध पुष्पमालिका
दु:खाग्नीतच करपुनि गेली हृदयीची जातिका
प्रेमाला निजहृदयी धरिले
प्राणपणाने त्यास रक्षिले
मोहांनी मन नाही चळले
मूढच मी पण नाहि जाणिले प्रेमाच्या कोष्टकां

ईश्वर-दर्शन-सुखा इच्छिता
पदरी पडली पूर्ण अंधता
चाचपडत मी चाले आता
अहो, जाहले ईश्वर-दर्शन हाडाच्या नास्तिकां

तेजाने हे उजळे त्रिभुवन
परी मला ते बंदच दालन
गुजरे घन तिमिरी हे जीवन
दुर्दैवाची काजळी पुटे झाकति मम दीपका

हाति माणके पत्थर झाली
पदोपदी अपयशच कपाळी
उन्मत्तांच्या पिचत पायदळि
या कंठातच गुदमरला हो हतभागी हुंदका

# मोकाट वर्षे

उच्चारूनी नाम माझे केले तू सनाथ
चिंब भिजली ही वीस वर्षे अमृतात

स्वरी तुझ्या ऐकता मंजुळ वेणूनाद
नाठाळ गुरे ही वर्षे नाचली नादात

गेलास तू झाली सांज आभाळ ढासळे
मूक टाहोंचे कंठात रक्ताळ थारोळे

वाट चुकली मोकाट गुरे सांजवेळा
फिरताती सैरावैरा धुंदीत गोपाळा

# प्रेमलहरी

१ एकच त्या स्वप्नाने रात्रंदिन चाळविले
एकमात्र चांदणीस जन्मभरी आळविले
हातीच्या अग्नीने मळिन ओठ क्षाळियले
पश्चातच प्रेमाचे मंत्रमेघ वोळविले
मरणाच्या दरडीवर विद्ध प्राण व्याकुळले
स्वप्नीच्या मृगजळात शुष्क ओठ ओलविले

* * *

२ स्मितांच्या अस्मानी प्रकाशात नाचत चमकत
स्वप्नांचे चांदवे हलते जे टांगले होते येथे
बेभान हर्षभरित व्हावयाची ही कारा
उमलल्या स्पर्शांच्या अत्तरी धुक्यात
अंधारहि इथला मखमाली सांत्वनशाली
पानगळ येथे बदामी बिंदी ल्याली

* * *

३ नेले एकदाच ओरबाडून सत्य प्रेम–विश्वासाचे
बळी अजापरी थिजले डोळे शब्द चिरल्या मुखीचे
झाली निद्रा परदेशी घोंगावत्या अंधारात
पसरले यमापुढती एकाकी भिक्षार्थी हात
तरी शमली वादळे रक्तांकित जोजविता मंत्रित लाट
तेज:पुंज ताऱ्यांची मृदुगंध पाकळ्यांची माधवी पहाट

* * *

४ आज जरी निरभ्र रिते रिते आकाश
निनादले होते येथे मेघकृष्णांचे पदन्यास
विजांच्या त्या गोपी जलधारांच्या टिपऱ्या
रोमरोमात घुमणारा मनमोहन रास
सुकल्या शाखांची भेगाळल्या धरतीचीं
बावरल्या प्राणांची आजहि तीच तीच आस

* * *

५ पुसटता दूर क्रूर जीवीची गमके
जुळेनात जुळविता ओठीची यमके
प्रीतिप्रार्थी कवितेचा खुळावता ध्यास
निसटले नकळता पापण्यांचे प्रास
चंद्र–अंगी आवळता काळे राहू पाश
सैरभैर लाजवंती मौनगाढ आकाश

* * *

६ दुरून पण इतक्या जवळून गडे तुला पाहिले
आणि शपथ अंगोपांगी भरभरून ठेविले
भरती ओहोटी वादळ शांत
सदा सदा तू आत नितांत
नाही जवळ नाही दूर
ओतप्रोत सजल हे ऊर

* * *

७ असतास तू तीरावरील वृक्ष, मी संथ तळे
असती झेलली हळुवारपणे अरुवार पानेफुले
पण आहोत सजीव आपण झेलायचे जगाचे घाव
माणसाळावयाचे स्वत:चेहि मर्कटभाव
काय नेम स्पर्शांचा झाळतील पंखे मोरपिसांचे
अन् जातील ठेवून मागे घाव गरम घणांचे

* * *

८ गडे अखेरी द्वंद्व आपुले अपरिहार्य काळाशी
ठरुनी गेले लढाईत या विजयी कोण अपेशी
बाविस वेळा पिकली पाने गेंद तरी टवटवला
हाती गुंफुनि हात प्रीतिचा मार्ग सदा आक्रमला
येइल जेव्हा अंतिम वेळा ध्यानी इतुके असु दे
याहुनि काही अधिक कुणाचे देणे घेणे नव्हते

* * *

९ उषासंध्यांच्या उज्ज्वलेची उदरस्थ ही सुंदरी
घळीत जन्ममरणांच्या प्रसवली प्राचीन नगरी
इथे नाही ग्रहण नाही विकास, नाही ऱ्हास
शाश्वत चंद्रसूर्यांचा अधरांवरला रास
येवो जरा येवो मृत्यू भरारी अंधारी पाखराची
चोचीत मोती प्रेमाचा पंखांत आशा उद्याची

## दर्शन

सजे सूर्यबिंब माझे
   तुझ्या पायाच्या नखात
तुझ्या चरणरजात
   स्वर्ग उभे राहतात

तुझ्या नेत्रीच्या भिंगात
   दोन निळ्या चंद्रकोरी
तुझ्या श्वासांचे चांदणे
   धुंद चित्ताची चकोरी

ओझरती आठवण
   करी दुःखभार दूर
नामोच्चाराची लहर
   होय जीवन सुंदर

निमिष कटाक्ष तुझा
   विश्वरूपाचे दर्शन
धन्य धन्य या लोचनी
   स्वर्ग-सुखाचे अंजन

# लाटांची साखळी

सरे नुकती सुकती
रेले लाटेवर लाट
ओले ओझे पेलवेना
सुगंधाने न्हाले काठ

लाट लागट वेल्हाळ
स्पर्श मऊ लडिवाळ
हळुवार चुंबनांची
बरसात हो सुढाळ

गहिवरल्या गीतात
निळ्या नादनीलयात
कळ निष्पाप निःशब्द
विसरली फरफट

येवो यायची सुकती
मिळो खोल गटांगळी
आज आनंद–भरती
भोळी लाटांची साखळी

आज घेणार आगळी
झेप निळी महाजळी
ओळखीची पैलतीरी
हाक ठाकली सावळी

## आलिंगन

तुझ्या एका आलिंगनी
साऱ्या अस्मितेचा स्पर्श
पार्थिव अपार्थिवाचा
देही संचरे प्रकर्ष

तुझ्या एका आलिंगनी
ओतूनिया सारे रस
क्षीराब्धीच मंथियला
कंठी पाझरे षड्रस

तुझ्या एका आलिंगनी
पूर्ण त्रैलोक्याचे रूप
देहस्तंभी उभारला
भावभावनांचा स्तूप

तुझ्या एका आलिंगनी
उचंबळुनीया रंग
प्रेम सोहळा पूर्वेचा
दाटे चोळीमधी तंग

तूझ्या एका आलिंगनी
सृष्टि-संगीताचा ध्वनी
सूर–ब्रह्म अवतरे
नादमग्न मी श्रवणी

तुझ्या एका आलिंगनी
पंचेंद्रिय एकवटे
पंचप्राणांचे हे शिल्प
पंचधामात चोखटे

# पिंगा

डोलणारी झाडे करी गुदगुल्या वारा
सावळासा मेघ आड लुकलुक तारा

परस्परा देती रवि वरुण गुंगारा
तुष्ट सृष्टिभाळी पुष्पपराग अंगारा

दुभत्या आभाळी झरें झुरूमुरू धारा
चिमण्यांच्या चोचीसाठी चवदार चारा

पानोपानी गहिवर थेंबांचा गजरा
पोपटी त्या साजावर खिळल्या नजरा

फुलपाखरांचा थवा धावे सैरावैरा
टपोरल्या गुलाबाला 'गूं गूं गूं' पहारा

फुलला फुलोरा झाला हर्षित पुकारा
श्रावण इशारा झडे स्वप्नांचा नगारा

फुलां-पानांचा धारांचा पाखरांचा फेरा
श्रावणाचा पिंगा आणी भोवळ सुंदरा

## वेडा

बंध तोडुनि जीवनाचे पुसुनि खारी आसवे
जीव वेडा उडुनि गेला मेघमालांच्या सवे

दंभ सारे त्यजुनि भुरक्या तरल मेघी गुंगला
अंतराळी मधुरसाने अंगभर ओथंबला

शीण सारा विसरला पाहूनि निर्मल वत्सला
टेकड्यांच्या मृदुल वक्षी भाबडा तो लोळला

वायु पिउनी तृप्त भोळा उठुनिया उत्साहुनीं
शीळ घुमवी गहन विजनी गंधमंत्रित गायनी

चिंब भिजल्या रसिक हिरव्या गवत पात्यांपासुनी
चोरुनी निःशंक चुंबी हा शराबी वारुणी

झोकुनी सौंदर्यमदिरा धुंद अन् बेहोषसा
जीव वेडा झिंगुनी मार्गी हरपला तो पिसा

## कहाणी- अशीच एका आत्म्याची

१ आटपाट नगरात
देहाच्या गोजिऱ्या गेही
एक भोळा आत्मा राही
सडारांगोळी अंगणी तुळशीचे वृंदावन
आत्मा राहतो रमून
पण–देह झिजत जातो
तिळातिळाने झिजत जातो
कणाकणाने सरत जातो
–उरीपोटी झुरत जातो
आत्मा; तुटत सुटत जातो
एक एक अस्थिर आधार

* * *

२ वर्षे पिकलेली कहाणी संपलेली
काळ पसरलेला थकून भागून
सारी सृष्टीच जणू गलितगात्र
पसरलाय कसलासा विशिष्ट गंध सर्वत्र
गुदमरल्या देहात आत्मा बिभीस्त
आक्रसला पीडित पराभूत.
टाक तोडून जीवनाचे मृणालपाश
फारच सुटला आहे तो वास
खूण कहाणी संपल्याची
घेणे निरोप स्वतःचा हताश

* * *

३ समोर काळा भयाण दर्या
अनंताचा अपार दर्या
कसा लागायाचा पाड
तरी प्राप्त करणे पार
दर्यास चढला काळा पूर
काळा क्रूर अंत-पूर
भीषण तो काळिया
घुसतो थेट अंतःपुरात
आणि हाणून टाकतो पाडून
भिंती, छप्पर, शक्ति, धीर.

* * *

४ मरण तर ठरलेच आहे अटळ
कां न स्वीकारावे राजीखुशी
नसेल तारा एकहि नभात
पण दूर पहा लुकलुकते दिवे
अंधारात तारू हाकारणाऱ्यांच्या
हृदयाशी जुळव आपले दुवे
अंतिम प्रयाणार्थ मित्रा तुला
हवेच बांधायला एक तारू
जरी असला मार्ग अज्ञात
जरी नसला तारा नभात

* * *

५ आली अखेरची हाक, मित्रा
बांध झटपट आपले तारू

हवेच आता निघायला
घे बरोबर भाकर, सदरा
काही बाही किडूकमिडूक
नकोस विसरू चादर श्रद्धेची
झाली रे वेळ प्रयाणाची
हाकार तारू ठेव प्रस्थान

* * *

६ हाकार मित्रा आताच तारू
जोवर जीवन ठिबकत आहे
क्षीण आत्मा दुर्बल तारू
दे सोडून निःशंक दर्यावर
अनंताच्या जळी मरणाच्या लाटांवर
फुटेलहि तुझे तारू
पण विश्वास ठेव मित्रा,
नेईल तारून बाप– रखुमाईचा वरू

* * *

७ हाकार दर्यात आपले तारू
भरकटू दे ते दिशाहीन
नेशील तरी कुठे कसे
ना दीप ना द्वीप ना किनारा
केवळ काळा काळा पूर
गुदमरवणारा अलोट क्रूर
खाली वरती काळे नाग
नाही दिशा नाही मार्ग

कुट्ट अंधार जागोजाग
नाही दिशा नाही मार्ग

* * *

८ खरेच का सारे गेले संपले
पुढे अंधार मागे अंधार
भीषण काळा गर्द अपार
यातच कुठेसे तारू इवलेसे
गेले गमते हरवून पार

* * *

९ प्रलयकाल सुचेना काही
काळे धुके दिसेना काही
तरी सारे संपले नाही
नसो दीप नसो तारा
ताण आपली दृष्टी जरा
तेवू दे दृष्टी समोर पहा
अस्पष्ट फिक्कट ठिपका पिवळा
भास नव्हे तो, दर्यापार
नवे विश्व क्षितिजापल्याड.

* * *

१० आणि पहा तर सावकाश
उजळत आहेत क्षितिज दिशा
निवला शमला अंधार, पूर
फैलावल्या पिवळ्याच्या कक्षा
उजाडली पहा नवी पहाट
नवी पहाट, नवी पहाट

अनंताच्या पल्याड वाट
दिसू लागले छोटे तारू
डगमग डगमग आहे हालत
गहिवरल्या लाटांवर डोलत
गुलाबी बदामी पहाट पुरात

* * *

११ कापीत अंतर गाठीत किनारा
लागले एकदाचे तारू तीराला
चुकत माकत डगमग ड़ोलत
बदामी तेजाच्या झोकात झोतात
पाऊल ठेवतो आत्मा नव्याने
किनाऱ्यावरील नव्या घरात
वृंदावनासमोर जोडून हात
जुन्या कहाणीची नव्याने सुरुवात
आटपाट नगरात

* * *

## प्रेमाची ग्रहरास

प्रेमाची ग्रहराशी अति उधळी
सांडविते मी–पणास
दिनरात्री

प्रेमाची ग्रहराशी मोहान्वित
साठविते तू–मयता
मधुपात्री

प्रेमाची ग्रहराशी स्वप्नखुळी
स्वर्गचित्र रेखितसे
जलपत्री

प्रेमाची ग्रहराशी अविवेकी
देइ धडक आकाशा
मृदुगात्री

प्रेमाची ग्रहराशी भ्रमणमुखी
शोधितसे सुंदरास
चिरयात्री

## भरवसा

नयन निरागस रोखुनि बघसी
   नयन नील तव नितळ आरसा
सांभाळ सखी, करू नको गे मजवरती भरवसा
   राधे ! मजवरती भरवसा
तुझ्या प्रीतिचा ओघ अनावर
   मी चंचळशी रेघ जळावर
सुकुमार तुझ्या हृदयावरती ठसवु नको गे ठसा
   राधे ! ठसवु नको कवडसा

कृष्णमुरारी भवभयहारी
   चंद्र प्रकटसी घन अंधारी
घोर रात्रिच्या आकांती तव प्रीत एक भरवसा
   कृष्णा ! कोण दुजा भरवसा
कसाहि अस तू, घेतला वसा
   रंज नसे लव तृप्त मानसा
तव परिसाने सुवर्ण झाली प्रीत लागु दे कसा
   कृष्णा ! एक तुझा भरवसा

## भले सांगती

भले सांगती–बांध सुरक्षित पदरी तू सोने नाणे
मला भावली उन्मन भक्ती प्रेमाची उत्कट वाणे

भले सांगती–महाग सौदा प्रेमाचा ठरतो अंती
क्षण प्रेमास्तव कोटि आसवे मोजुनि पटवियल्या किमती

भले सांगती-लोकविलक्षण प्रेमाचे लक्षण खोटे
प्रेमापुढती वहिवाटीचे विश्व आढळे खुळे थिटे

भले सांगती-निघेल वेडे, मधुमासाचा क्षण फसवा
त्याच क्षणांवर प्राण उधळिता फळला भाग्याचा कुसवा

## स्त्री

माता मादी दासी अससी
कन्या भगिनी देवी अससी
देसी प्रेम नि घेसी प्रेमा
पुरुषाचे मित्रत्व न तुजसी

बलात्कार अन् पवित्र पूजन
क्रूर पिळवणुक, मृदु संरक्षण
तिरस्कार कटु , दयार्द्र प्रेमा
सर्व सर्व करि पुरुष तुजप्रती

उपभोगित अन् उच्चाधिष्ठित
दुर्लक्षित अन् पददलिता तू
परमपूजिता तुच्छ उपेक्षित
विटंबिली शापित मूर्ती तू

हे स्त्री ! पुरुषाशी तव नाते
निकट निकटतम व्यक्तिगत असो
तरीहि अससी त्याच्या मनि तू
अत्युत्तम तरि लव कनिष्ठशी
केवळ वस्तू ! केवळ वस्तू !

# समय विहग

प्रणयमदिर पुनव निशा समयविहग थरथरला
पदि नूपुर रुमझुमला

रजत तेज, मृदुल शेज
विचलित करि विधुकर मज
कामकथा कथित कथित मदन कुशल कुजबुजला
हृदयि उठत लहर लहर
तनमनि ये प्रणयबहर
अननुभूत कंपन उरि अधिरभाव सखि, स्फुरला
सजणस्पर्शि धुंद श्वसन
मिटति नयन गळत वसन
अधर जुळविताच तये ऊर खुळा धडधडला
रसरसले नवथर तन
कामज्वर हो न सहन
मधुकर तो रमत सुमनि परिमल गे घमघमला
क्षणभर जिव डगमगला
किंचित जरि अवघडला
रतिगीता ललित चरण चरण पढत लवथवला
स्वप्नलता ये बहरुन
प्रतिक्षण करि मृदु पखरण
सुम सुरभित हृदि बरसत मदनमंत्र दुमदुमला
समयविहग मग पसरुन
निज पंखां, करि उधळण
गळति धवल मौक्तिकमणि आसमंत झळझळला
समय विहग थरथरला

## क्षण

मत्त उसळत्या
सागरात मग
वितळुन गेले धुंद गगन अन्
चंद्र पेटला
गगन पेटले
स्फोट सागरी

लहरिलहरिवर चंद्र धवळले
उजळ ढवळली श्यामल क्षितिजे
तप्त तीक्ष्ण उत्तुंग त्या क्षणी
समूळ तेजस्तंभ निसरला

कातरवेळी कातरक्षण तो
आला क्षणभर
मरण चुंबुनी
उरि अमराचा
टिळा लेवुनी

# पैलतीर

मेघांनो कां झाकोळला माझे पैलतीर
वाजवितो पावा तेथे माझा यदुवीर

ओला चिंब निंब गाळी सरी माझ्या शिरी
घोंगावला घोर वारा येई मज घेरी

सारीत डोळीच्या बटा उभी मी या काठी
बोलावितो यदुवीर जन्माच्या या गाठी

धन धान्य गंडे दोरे नको या तिपारी
पैलतीराचे दर्शन पुरे ही शिदोरी

पोचेन मी पैलतीरी कधी कोण जाणे
तोवरी हे जीव लावी दर्शन दिवाणे

मेघांनो झाकोळू नका माझे पैलतीर
वाजवितो पावा तेथे माझा यदुवीर

# स्पर्श

स्पर्शमात्रे बुडविले डोह डोह वेदनांचे
अंधारात आंदुळले मोह विमोह स्वप्नांचे

स्पर्शमात्रे विझविले दीप दीप वेदनांचे
अंधारात उधळले धूप चंदनी स्वप्नांचे

स्पर्शमात्रे मावळले चंद्र चंद्र वेदनांचे
दहिवरल्या पहाटे स्वप्न गोरे गगनाचे

स्पर्शमात्रे स्वप्नावले दवबिंदू गहनाचे
बिंदू बिंदूत नाचले सूर्य सूर्य मोहनाचे

## स्वरकिमया

उंच उंच वृक्षांच्या रांगा ऐकीत सूर
डोलतात स्वरलीना होउनिया चूर चूर

दूर दूर नीलांबर शैलवृंद मोहुनिया
गुणगुणती गत संगे पालवता स्वरकिमया

स्वरनिर्भर शशिबिंबे लाट लाट बहकविता
धुंदावत सागरही कवळी स्वरसुंदरता

तृणपाती स्वरपुलकित देती गगनास हाक
लागुनिया स्वरसमाधि होई परि ते अवाक

स्वरनिमग्न खगप्राणी स्वरमोहित नरनारी
स्वरमाया हो मुरली पाचारित गिरिधारी

स्वरप्रसन्न पुष्पे क्षण विसरुनिया उन्मीलन
स्वरस्पंदन उमलवु दे विश्वाचे स्वप्न गहन

## झूला

चालायाचे होते मजला सरळच रेषेवरती
परंतु वेगे पुढती

पदर खेचला कुणी मागुनी दृढ हातांनी धरुनी
पाय अडे अडखळुनी

हिसका मारुनि पदर सोडवित, वाट पुढे मज ओढी
वाट परी ती तेढी

अशी चालली चढाओढ नित सरळ नि तेढया रेषा
उलटी त्यांची भाषा

सरळ जाउ मी अडखळुनी की वेगवाकडी पुढती
हो दोलायित वृत्ती

मागे–पुढे सरळ-तेढयाचा डगमग करतो झूला
जीव किती तगमगला

लटका रमला, श्रमला, भ्रमला जीव खुळा रडवेला
घे रे जवळि कृपाळा

## मरण-वधू

तुज उदंड भिउनी रे मरणा!
अजि आसुसले मी तव चरणा

आग विखारी अन् भेसुरता
घाव जिव्हारी अन् निर्ममता
धुत्कारासम अधम अशुभता
मानिल्या तुझ्या मी याच खुणा

वाटे येशिल तमावगुंठित
भयदायक पद नीरव टाकित
पकडशील पंजामधि अवचित
लव दया न तव अंत:करणा

येशिल नरसिंहासम अथवा
वखवखला जणु वादळ वणवा
विदीर्ण करशिल जर्जर जीवा
तुज नसेल, वाटे, तिळ करुणा

जीवनमदिरा पीत झिंगुनी
गाइलि जीवनगीते विजनी
आक्रंदन ये अंति प्राक्तनी
अग्निकुंडि जळले पुन्हा पुन्हा

मुक्त करी रे जीवनातुनी
इथली आता सरे मोहिनी
उरले सुरले सारे त्यजुनी
खचित वरिन मी तुज मरणा!

# अबोली

यमुनातिरी उभा मी अति सुन्न सांध्यकाली
अशि तीव्रशी उदासी मन झाकळूनि गेली

मधु मंद गंध ल्याली हलके झुळूक आली
मम खिन्न मानसाला हळवे करून गेली

अन् चंदनी सुगंधा भिनवीत रोमरोमी
अति मंद पावलांनी ही कोण येथ आली

ती कृष्णवेषधारी मूर्ती समीप आली
हुरहूर कां अनोखी हृदयात जागवीली

हे काय, स्पर्श कैसा शीतोष्ण वक्षि माझ्या
हे कोण पुष्पमाला माझ्या गळ्यात घाली

मधु गंध चंदनाचा माझ्याच राधिकेचा
अन् कृष्णवेषधारी ती राधिकाच आली

मज ओळखूनि राधा बिनबोलताच गेली
कां ती अशी दुरूनी मज टाळुनीच गेली ?

भुलणार राधिके ! मी नाही तुला कदापि
तुजसारखीच माझी प्रीती सदा अबोली

# प्रीत

करावीच कां जगती प्रीत ?
निराश अगतिक
दुःख पिळवणुक
तीच हंसवणुक
तीच फसवणुक
भावुक जवळिक
अन् कायमची
क्रूर वेगळिक
हीच प्रीतिची दाहक रीत
करावीच कां नाहक प्रीत ?

कां न करावी जगती प्रीत ?
मूक मनांची
मूर्त मिळवणुक
अपूर्णतेची
गोड पुरवणुक
गुंफण नाजुक
अपार कवळिक
मंगलदायक
जीवनतारक
हीच प्रीतिची सुंदर रीत
कां न कराविं निरंतर प्रीत ?

## स्त्रीची कैफियत

एक होता काळ तिजला मानिले तूं देवता
भासली तुज प्रेमप्राप्ती जीवनाची सांगता
आणि तिजसी अर्पिले तूं भाव सारे तू-पण
पूजिले देवी म्हणूनी तूं प्रियेचे पैंजण

देविची होऊनि स्त्री तुझिया गृहाची स्वामिनी
जाहली ती त्या क्षणी तू केलि प्रीती मोहुनी
मात्र गेली कुस्करोनी या निनावी जीवनी
ये गुलामी फक्त अंती भोग स्त्रीच्या प्राक्तनी

स्त्रीवरी ठेवूनि भक्ती कां घडे हे जीवनी
कष्टवीती नित्य तीते देत हृदयी डागणी
हाच पुरुषाच्या कपाळी शाप आहे भोगणे
आणि स्त्रीच्या प्राक्तनी हे मातिमोलाचे जिणे

## गोवा

अंत न ज्यास असा मधुमास
गवसला येथे विनसायास
गहिऱ्या छायांच्या गात कुशीत
उमगली गूढे दिःकालातीत

असंख्य रात्रींचे अंजन नेत्री
अनंत उषांचे मांगल्य गात्री
लेवूनी भूमि ही लाविते ळळा
मायेने वायूच्या दाटला गळा

भूमि ही लावूनी लाघवी पिसे
जडवी जीवास हळवी पिसे
येथे मी-पणाची उडे वावडी
स्थलाच्या कालाच्या ओलांडी तडी

विसावा लाटांच्या विलोल गेही
नभाचा नीलाभ स्पर्श या देही
ब्रह्म-स्वरुपाचे जीवास लेणे
जन्मांचे मृत्यूंचे बंधन नेणे

# कारूण्यमूर्ती

तारुण्याने मुसमुसलेली मूस जणू लावण्याची
कां गे राधे ! तरळे तुझिया नयनि छटा कारुण्याची ?
बालकृष्ण पाहिला सावळा जावळ कुरळे भुरभुरते
पाहता क्षणी आले होते हृदयी प्रेमाचे भरते

विश्वरूप तो बालसखा हरि नंदाघरि मी देखियला
तेव्हांपासुनि या हृदयाचा धागा धागा गुरफटला
शुक्लपक्षिच्या चंद्रकलेपरि बालहरी मोठा झाला
पूर्णचंद्र नवयुवक बनोनी कायमचा मन्मनि ठसला

भावपुष्प वाहुनी निशिदिनी पूजिलि मूर्ति कन्हैय्याची
सर्वस्वाचा कापुर जाळित आस धरलि मी प्रेमाची
तातांनी अनयाशी माझी जन्मगाठ जों बांधियली
दैवयोग तो क्रूर पाहुनी मूक आसवे ढाळियली

एकच धरली आस अंतरी त्यानंतर मातृत्वाची
इच्छित फल मी कृष्णाकडुनी खूण तयाच्या प्रीतीची
पाहियले मी होते गोकुळि या त्या कितीक गोपींना
काळचा काटकुळचा प्रौढांना माता बनुनि मिरवितांना

तेही नव्हते भाग्य ललाटी, अमा सदाची मम गगनी
मोहभ्रष्ट मम ठरली प्रीती झाले व्यभिचारिणी जनी
नाही दिधले कृष्णानेही जाण्यापूर्वी कां मजसी
बालरूप लडिवाळ गोजिरे विकल हृदयि या धरण्यासी

आर्त आस ही अपुरी हृदया गिळे काजळी दुःखाची
कृष्णानेही नाहि जाणले, जाणिव ही मजला जाची
तारुण्याने मुसमुसलेली मूस जणू लावण्याची
कृष्ण पावुनी राधा उरली भावमूर्ति कारुण्याची

## प्रतीक्षा

गाभुळले जांभुळके ढग लोंवलेले
ओथंबला राखी–भुरा वारा जडभारी
पेंगुळली पिकलेली रोडावली झाडे
आर्तावला आसमंत येऊनिया घेरी

पिचलेला पांढुरका प्राणांचा पिंजरा
मरगळे मख्ख मुकी मंतरली मैना
प्रतीक्षेचे पैंजण पत्थर-पुतळ्यांना
जीवघेणा घालितसे कोण हा उखाणा

# झुळूक

उत्तररात्री गळल्या गात्री अत्तर गाळित झुळूक येते
दीर्घश्वसनी वाळा उसवित ढळल्या वसनी व्यूहा रचिते

झुळुक चाळवित हिरवळ झिरमिळ खुलवी तृणपुष्पे रोमांची
बनुनी अवचित वादळवारा ढवळी गहन जळे डोहांची

झुळुक फोडि आशांचे मोहळ स्वप्नकळांची घालित रूंजी
मदनकेवडा दरवळ नकळत उडवी उंच प्रणयकारंजी

पहाटता आळसल्या गात्री अत्तर गाळित झुळूक येते
खुळी हुरळुनी हळूच फिरते वेचित हलके हळवी गुपिते

## कृतार्थ

हळदीचे माझे अंग
केतकिचा माझा रंग
करपला तरीं मन रंगरंगले.
सोनचंपकी दंग

चांदणिचे माझे नयन
सुमनांवर माझे शयन
चांदणे सुमन जरि सुके तरी मन
नसे लवहि बेचैन

मोतियारंगि मउ ऊन्ह
जरि प्राक्तन जाइ पिऊन
तरि धूसर रंगी भिजत गाइ मन
प्रेमादिवाणी धून

होडीचे शीड विदीर्ण
हे क्षितिजहि अति विस्तीर्ण
नाविक हृदयी तरी शिगोशिग
कृतार्थता परिपूर्ण

# पूर्ण चंद्र ही प्रीत

कमलदलासम नेत्र तुझे अन् मधासारखी नजर
मधात कधि जरि विखार मिसळे प्रणयातुर मी हजर

चंदनगंधित बाहु तुझे अन् मखमाली मृदु अंग
मखमलीत कधि लोह जरि मिळे आलिंगनि मी दंग

अथांग दरिया हृदय तुझे अन् फेनधवल तव प्रीत
धवल प्रीत कधि मलिन होइ तरि तूच जिवलगा मीत

प्रेमा नाही कळा अवकळा म्हणो कोणि अक्रीत
अर्धचंद्र तू अर्धचंद्र मी पूर्णचंद्र ही प्रीत

## पसर आभाळ

जेव्हां केव्हां गेलीस
तेव्हां तेव्हां वाटलं,
नव्यानं बाळाची
कापली नाळ

हे सारं असं हवंच होतं व्हायला
अंधारातून प्रकाशात हवंच होतं यायला.
स्वतःच्या हिंमतीवर हवंच की जगायला

तरीहि कां आठवती—
मांडीची ऊब, पदराचा अंधार
वटारल्या डोळ्यांचा तपकिरी अंगार

तपकिरी पिंजऱ्यातून पळून जावे दूर दूर
जंग जंग पछाडावे स्वतःत रहावे चूर चूर
तरी कळवळे ऊर आणि ओठी एक सूर

आई, आई, कापली बाळाची नाळ
ताळ सुटल्या कपाळी खरेखोटे आळ
अंधाराची ऊब दे पसर आभाळ

## पूजा

उजाड रस्त्याच्या टोकाशी
एकाकी कुणि झाड वाकुडे
वाकवाकुनी आठ ठिकाणी
कुब्जेसम हे तिष्ठते खडे

तुरे सुगंधी पिवळ-पांढरे
मधुर हासती तिला बिलगुनी
'कृष्णसखा का पूजिसि कुब्ज
गंधभार हा वाहुनि विजनी.'

रूप गंध मज असो वा नसो
आळवी न मी कोणी दूजा
जीवनमार्गी अढळ राहणे
जीवन-श्रद्धा माझी पूजा

## जा तू

उद्या जायचे, आज परंतू
दिवस आपुला, रात्र आपुली
या दिवसाची, या रात्रीची
स्मृती प्राक्तनी गोंदुनि जा तू

सुकायची ही वेल अता अन्
गळायचा हा बहर मातिमधि
पुष्पांवरती आज परंतू
फूलपाखरें खुलव डुलव तू.

जाणार उद्या, खुशाल जा तू
घेरिल काळे धुके सभोती
गोड मधाचे गडद चांदणे
त्यापूर्वी परि शिंपुनि जा तू.

अखेरचे आलिंगन अपुलें
एकजीव निकटोत्कट असु दे
ठसा तुझ्या श्यामल देहाचा
गौरांगी मम ठेवुनि जा तू

अथवा वेड्या मीरेसम मी
रचिते चंदनचिता सुगंधी
मीरेच्या निर्मम योग्यासम
चिता चंदनी जाळुनि जा तू.

## स्पर्श

गांजुनिया जों घातला
सुखा लाखाचा उखाणा
मुक्या जीवा जोजवीत
आला स्पर्शाचा पाळणा

गात्रांच्या गलित गेही
आर्जवाच्या आमंत्रणा
प्रेमे धाडिला देखणा
स्पर्शाचा स्फटिक मेणा

सुखावुनी अंधपणी
बळे बांधिता शृंगारा
दाही दिशा कोंडमारा
झाला स्पर्शाचा पिंजरा

बंदी जीव चोळामोळा
ऐकूनिया आक्रंदन
मुक्त कराया अंबरी
आले स्पर्शाचे विमान

## विलापिका

१ कसा भरून आहे या माजघरात
ताटीवरच्या फुलांचा वास, मृत्यूचा श्वास
इथेच कण्हले कुंकुम डोळे
भिजले थिजता तो पदन्यास

* * *

२ तू नाहीस इथे; येणार नाहीस कधीही
जाणून आहे मी तरीहि राहते वाटत
मान वळविताच भेटेल डोळ्यांना
तुझी नजर बोलकीं लाडकी खचित

* * *

३ ही तुझी कवितांची वही
शब्दांकित मखमाली पान अन् पान
रचण्याऐवजी कविता, येतीस निकट—
निवले असते ग क्षणभर तान्हेले प्राण

* * *

४ स्वर्गाची नव्हती गरजच तेव्हा
जीवनी बुडलो होतो ओतप्रोत
वाटली नाही देवांची मातब्बरी
तेवली अविचल प्रेमाची ज्योत

५ 'होतीस तू माझी सखी' नाहीस जरि आता कुठे
रेखतो हे शब्द केवळ कागदावर कोरडे
खेळ दारुण जीवनी या निर्दयी नियती करी
तोटके मी शौर्य माझे दावितो शब्दी गडे

* * *

६ झुरत संतत सखि, तुझ्यास्तव
दुःखडोही डुंबलो
पाहिजे तरि अन्ननिद्रा
देह-धर्मी डांबलो

* * *

७ एकमेकी सहज रमलो जीवनी ऐसे गडे
विसरलो की मरण नेइल वेगळाले आपणां
तरि तुझे सखि, हृदय जगते या शरीरी माझिया
तुजसवे चढले चितेवर हृदय माझे तर्पणा

* * *

## पीपासा

ती गर्द गुलाबि उफळती
जों झळाळली पीपासा
जाणिले मरण ये मागे
घेऊनि अचुक मागोसा

स्पर्शांना फुटुनी जिव्हा
जिव्हांना फुटला मोहर
प्राणांना फुटुनी तारा
तारांना सुचले सुस्वर

ते गर्भित गूढ गुलाबी
ती गोल बिलोरी भिंगे
चुंबण्या दुहेरी बिंबा
वर पिसाट जीव तरंगे

तो तीव्र प्रदीर्घ उसासा
प्रीतीचा तृप्त दिलासा
हा हिरवट कोंदट चिकटा
ही घुसमटती पीपासा !

## ऋतुचक्र

श्वास पोळले
तनमन जळले
तरिहि पावले
हरित गारसे आर्द्र हवेसे
रसिक दिल् उन्हाळे

तन गारठले
भाव गोठले
तरिहि गावले
गर्द केशरी यक्षशरीरी
नर्म दिल् हिवाळे

क्षितिज भारले
डोळे भरले
तरिहि भावले
निळे जांभळे वादळभोळे
दर्द दिल् पावसाळे

## वास्तवता

वास्तवता ? वास्तवतेविन तुमच्या माझे मुळि न अडे
सौंदर्याच्या बावडीमधी स्वप्नदोर नित बुडे

कुणी कापता गळा कुणाचा म्हणता वास्तवता
कितीक देती जीव जिवाला ती नच वास्तवता ?

रोग, व्यथा व दारिद्रय
हिंसा, असत्य, वार्धक्य
युद्ध, पिळवणुक, बळजोरी
भूक कपट वा छळ चोरी
हीच का असे वास्तवता ?

झुळुक मंदशी वाऱ्याची
किलबिल अवखळ पक्ष्यांची
चिन्माया निळवंतीची
स्तन्यपान अन् सुमधुरगान
हास्याचे दैवी वरदान
प्रेम निरागस ती किमया
माया प्रभुची दे अभया
भक्ति त्याग अन् वैराग्य
सत्य ज्ञान अन् सौंदर्य
हीहि नसे का वास्तवता ?

बावडीमधी सौंदर्याच्या पात्र प्रीतीचे स्वप्नदोर ही—
ही मम वास्तवता.

# नियतीचे जाते

गरगर घरघर भरभर फिरते हे नियतीचे जाते
या दाण्याशी त्या दाण्याचे कसले कुठले नाते

कणकण हाती धरुनि उचलवी
मुठमुठ भरुनी खळयात रिचवी
गरगर खुंटा हाती फिरवी
हात कोणता फिरवी जाते, ओवी गात मुखाते ?

तांदुळ यव नाचणी बाजरी
उडिद हरबरा मूग जवारी
जात्यामध्ये दळती सारी
मिश्र पिठाचे करुनी मांडे कोण आंधळे खाते ?

दाणा दाणा अलग अलगसा
चूरच अपुल्या दुःखी जैसा
दळणाऱ्या हाताशी कैसा
संबंध ? इथे एकलेपणी आहे ज्याचे जे ते
गरगर घरघर खरखर फिरते हे नियतीचे जाते

## शापित

होरपळली धरती अंगांगी वाभाडे
काळजाला घोर तडे
कातळाच्या कुशीमधी आगीचे सांकडे
कोसळले शिरी कडे

विस्फारलेल्या डोळयांत निळाईची ओढ
ओरखडयांचे काजळ
मायेच्या भुकेल्या मुखी कोंबले कोंदट
धूळ भरले वादळ

ओर्बाडली बाळलेणी चोखलेल्या मुठी
कल्पितातलेच लळे
शापभ्रष्ट भोळे तळे गढूळली जळे
सुन्न कोळपले मळे

काळे घन झेपावले ओथंबले प्रेमे
बरसले पावसाळे
शापिलेल्या तळयाची गढूळल्या पाण्याची
होतीलही निळी जळे

## याच क्षणाचे

याच क्षणाचे याच क्षणाचे
मोहपुष्प मी मिरविते मनी
याच क्षणाचे

मर्माहत मी मृतवत् असता
मिळाली मजसि अतीव मधुरता
निर्जिव शरिरी प्राण ओतण्या संजीवन प्रेमाचे
याच क्षणाचे

रूप सावळे गोड मनोहर
वेड लाविले जिवा खरोखर
जीव भटकला आरक्षित करि कुंपण हे प्रेमाचे
याच क्षणाचे

हृदय-कमिलिनी विरहदुर्दिनी
भावपाकळ्या घेई मिटुनी
मिटला जीवनकोष उघडण्या मंत्रवचन प्रेमाचे
याच क्षणाचे

मीलन अधरांचे नयनांचे
दृढ आलिंगन जिवाशिवांचे
पूर्ण प्रणयी पूर्ण विकसते स्वर्ग-पुष्प प्रेमाचे
याच क्षणाचे

# यात्रा

नंदनवनची यात्रा माझी, लोभ न कसला दूजा
यात्रा माझी पूजा

पाय जरी चिखलामधि माझे
कमळ रसरसे दंवात ताजे
नाते माझे कमळांशी, मम सखा असे ऋतुराजा

मार्ग दीर्घ, कधि पदी निखारे
तरी खुणविती मजला तारे
खिळवुनि नयना गगनी बघते वळवण्यास मी क्षितिजां

नंदनवन मज मिळो, नच मिळो
मार्गी प्रेमळ पवन दरवळो
हितगुज मनिचे सांडित जाइन उधळीत रीतिरिवाजां

नंदनवनची यात्रा माझी लोभ न कसला दूजा
यात्रा माझी पूजा

REFBK-0022602

REFBK-0022602